**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
*Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2016 = 4.44, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.48612, DEC-JAN 2018, VOL- 5/25*

# "खानदेशातील सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत अनुदान प्राप्त प्राथमिक शाळांचा सर्व शिक्षा अभियान अनुदान अंमलबजावणीचा अभ्यास"

एस. आर. चव्हाण & एस. व्ही. भोपे, ph D.
( वाणिज्य विभाग ) कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तळोदा महिला महाविद्यालय नंदुरबार जि. नंदुरबार- ४२५४१३
(वाणिज्य विभाग) कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तळोदा महिला महाविद्यालय नंदुरबार जि. नंदुरबार- ४२५४१३

***Abstract***

सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत खानदेशातील सरकारी प्राथमिक शाळांना सर्व शिक्षा अभियान योजनेचे अनुदान प्राप्त होते. या अनुदानाचा खर्च विषयक अध्ययन संशोधन विषयात केले आहे. ०६ - १४ वर्षे वयोगटातील मुलामुलींना "मोफत व सक्तीचे शिक्षण" व "सारे शिकूया पुढे जावूया" हे ब्रीद वाक्य घेवून सर्व शिक्षा अभियान योजना केंद्र सरकार मार्फत राबवली जाते. विविध कारणांसाठी आवश्यकता विचारात घेवून "सर्व शिक्षा अभियान" योजनेचे अनुदान प्राप्त होत असते. या अनुदानाचा वापर कशा पध्दतीने केला जातो. व अनुदान खर्च विषयक आर्थिक व्यवहार कसे केले जातात. तसेच सर्व शिक्षा अभियान योजनेची अंमलबजावणी कशा पध्दतीने केली जाते या विषयी अभ्यास केला आहे.

**ब्रिज संज्ञा**:- सर्व शिक्षा अभियान योजना, मोफत व सक्तीचे शिक्षण, सारे शिकूया पुढे जावूया.

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:-**

खानदेशात धुळे नंदुरबार व जळगाव या तीन महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा समावेश होतो. खानदेशाचा परीसर महाराष्ट्र राज्याच्या उत्तर दिशेला आहे. महाराष्ट्र राज्याचा मुकूट असल्या सारखे खानदेशचे अस्तीत्व या भागाचे आहे. विविधतेने भिन्नता असलेल्या या भागात विविध जाती व धर्माचे,

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

बोलीभाषा,व्यवसाय, सण- उत्सव, रितीरिवाज, असलेले लोक या भागात राहतात. धुळे व जळगाव जिल्ह्यात कुणबी पाटील समाजाचे तर नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणावर राहतो. भौगोलिक दृष्टीने नर्मदा, तापी या बारमाही वाहणाऱ्या  पश्चिम वाहिनी असलेल्या नद्या आहेत. तर खानदेशच्या उत्तर दिशेला सातपुडा पर्वत आहेत. उंच, सखल, डोंगर, दऱ्या, खोरे, सपाट,असा हा प्रदेश आहे. अशा परीस्थितीत प्राथमिक शिक्षणाची सोय सरकारने शहरी व ग्रामीण भागात उपलब्द करून दिली आहे. गावागावात, खेड्या-पाड्यावर, दऱ्या-खोरयाच्या ठिकाणी ज्या ठिकाणी लोक वस्ती आहे अशा भागात सर्व शिक्षा अभियान योजनेच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षणाची सोय करण्यात आली आहे.

सर्व शिक्षा अभियान योजनेच्या माध्यमातून विविध प्रकारचे अनुदान आर्थिक स्वरुपात प्रती वर्षी जिल्हा परीषद, नगरपालिका व महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांना दिले जाते. या शाळेत वय वर्षे ६ ते १४ पर्यंतच्या वयोगटातील मुला- मुलींना इ. १ ली. ते इ. ८ वी. पर्यंतचे प्राथमिक शिक्षण दिले जाते. राज्य घटनेतील तरतुदीनुसार मोफत व सक्तीचे शिक्षण ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना दिले गेले पाहीजे. व कोणीही शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर जाता कामा नये किंवा कोणीही शिक्षणा पासून वंचित राहणार नाही. असा संकल्प घेवून “सारे शिकूया पुढे जावूया” या तत्वाने सर्व शिक्षा अभियान योजना संपूर्ण भारतात राबवली जाते. त्यातूनच शिक्षण विषयक सोय खानदेशातील प्राथमिक शाळांमधून केली आहे.

सर्व शिक्षा अभियान योजनेच्या माध्यमातून प्राथमिक शाळांना प्रती वर्षी शाळा अनुदान शालेय उपयोगी साहीत्य खरेदी करण्यासाठी दिले जाते. तर शिक्षक अनुदान शिक्षकांच्या संख्येनुसार प्रत्येक शिक्षकाला शैक्षणिक उपक्रम वर्षभरात राबविण्याच्या दृष्टीने खर्च करण्यासाठी दिले जातात. तर शाळा देखभाल व दुरुस्ती अनुदान शाळेच्या वर्ग खोल्यांची संख्या विचारात घेवून इमारतीची दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी देले जातात. त्याच प्रमाणे जुन्या शाळांच्या वर्ग खोल्यांची मोठ्या प्रमाणावर दुरुस्ती, नवीन शाळा खोल्यांचे बांधकाम, अपंग समावेशीत शिक्षण अंतर्गत अपंग विद्यार्थ्यांसाठी अनुदान, किचन शेड बांधकाम

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

अनुदान, प्रशिक्षण अनुदान, खेळणी साहीत्य, संरक्षण भिंत बांधकाम, पिण्याच्या पाण्याची सोय, इ. विविध प्रकारचे अनुदाने मंजूर केली जातात. या अनुदान रकमेतून शालेय कामकाज चालत असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनुदाने वापरली जातात. अनुदान रकमांची अंमलबजावणी किंवा वापर कशा प्रकारे केला जातो याचा (सन २००२ ते २०१४) हा कालखंड विचारात घेवून संशोधन विषयाचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाचा उद्देश:-**

संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी खालील प्रकारचे उद्देश निश्चित करण्यात आले आहे.

१) ०६ – १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना दिल्या जाणारया शैक्षणिक सुविधांचे अध्ययन करणे.
२) अनुदानांचा वापर योग्य कारणांसाठी होतो का या संबंधीचा अभ्यास करणे.
३) अनुदान खर्चाबाबतचे व्यवहार बँक साधनांमार्फत (उदा. चेक, मागणी धनाकर्ष, इलेक्ट्रोनिक ट्रान्सपर इ.) होतात का याची माहीती घेणे.
४) अनुदानातून पुरेशा प्रमाणात व वेळेत पैसा उपलब्द होतो का याची माहीती करून घेणे.
५) महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परीषदेने कार्यान्वित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन केले जाते का याचे अध्ययन करणे.
६) अनुदान खर्च करताना विशिष्ट रकमांपुढील व्यवहार टेंडर व कोटेशन या पध्दतीचा वापर करून केले जातात याची शहाणीशा करणे.

**संशोधनाची गृहीतके:-**

संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी खालील प्रकारची संशोधनाची गृहीतके निश्चित करण्यात आली आहे.

१) ६-१४ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना शिक्षणाच्या सुविधा उपलब्द करून देण्याच्या उद्देशाने सर्व शिक्षा अभियान योजना राबवली जाते.
२) सर्व शिक्षा अभियान योजनेतील अनुदानातून पैसे वेळेत व पुरेशा प्रमाणात उपलब्द होत नाही.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

३) सर्व शिक्षा अभियान अनुदान खर्चाबाबत सर्व व्यवहार बँक साधनां मार्फत होतात.

४) सर्व शिक्षा अभियान अनुदान खर्च करताना टेंडर व कोटेशन या पध्दतीचा वापर होत नाही.

५) महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परीषदेने कार्यान्वीत केलेली मार्गदर्शक तत्वे अनुदान खर्च करताना आमलात आणली जात नाही.

**संशोधन पध्दती:-**

संशोधन माहिती संकलनाच्या प्राथमिक व दुय्यम स्रोतांच्या माध्यमातून संशोधन विषयाची माहिती गोळा करण्यात आली आहे. दुय्यम स्रोतांच्या प्रश्नावली या प्रकारचा वापर करून सर्व शिक्षा अभियान योजना अनुदान प्राप्त प्राथमिक शाळेच्या शिक्षकांकडून प्रश्नावली किंवा अनुसूची भरून घेण्यात आली. RANDOM SAMPLING या प्रकारचा वापर करून ६८५ प्राथमिक शाळांची प्रश्नावली / भरून घेण्यात आली. संशोधन माहितीचे विश्लेषण करण्यात येवून गृहीत्कांची पडताळणी घेण्यासाठी Z test व Chi-Square test चा वापर करण्यात आला. व त्यावरून संशोधन विषयाचे निष्कर्ष मांडण्यात आले आहे.

**विषयाचे विवेचन:-**

खानदेशातील शाळांचे सर्वेक्षण करताना प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती प्राप्त करून गृहिते तपासून पाहिले असता,

**गृहीत कृत्य क्र. १ ची पडताळणी केली असता,** ह्या गृहीत कृत्याची पडताळणी करण्यासाठी Z सांख्यीकीय चाचणीचा वापर करण्यात आला असून त्याकरीता प्रश्नावलीतील प्र. क्र.१ अ) नुसार माहिती घेतली असता शाळेत कोणत्या इयत्तेपर्यंत शिक्षण दिले जाते त्यासाठी शाळेची वर्ग संख्या १ ते ४ थी वर्गापर्यंत ५४५ प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण दिले जाते, १ ते ७ वी वर्गापर्यंत १२२ प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण दिले जाते. तर १ ते ८ वी वर्गापर्यंत १८ प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण दिले जाते. म्हणजेच पहिली ते आठवी पर्यतच्या मुला मुलींचे वय ६- १४ वर्षे वया पर्यत असते.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

Z चाचणीचे परीक्षण केले असता चाचणीचे गणितीय मूल्य ०.०५ सार्थक ते वरील सारणी मुल्यापेक्षा (∝ = ०.०५) जास्त आहे. d.f.=n - 1 = २ - १ = १ Z चाचणीचे गणितीय मुल्य ५% लक्षणीय पातळीला २६.१७ हे तक्ता मुल्य १.९६ पेक्षा जास्त आहे याचा अर्थ परिकल्पना बरोबर आहे. म्हणजेच शून्य परिकल्पनेचा अस्वीकार केला जातो. व त्यावरून असे सिध्द होते की, ६-१४ वर्षे वयोगटातील मुलामुलींना शिक्षणाच्या सुविधा उपलब्द करून देण्याच्या उद्देशाने सर्व शिक्षा अभियान योजना राबवली जाते.

**गृहीत कृत्य क्र. २ ची पडताळणी केली असता,** ह्या गृहीत कृत्याच्या पडताळणीसाठी X2 (काय स्कुअेर) चाचणीचा वापर करण्यात आला. विश्लेषणासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १४, १५, १६, १७, १८, १९ नुसार प्रती वर्षी दिले जाणारे शाळा अनुदान, शिक्षक अनुदान व शाळा देखभाल व दुरुस्ती अनुदान वेळेत व पुरेशा प्रमाणात उपलब्द होते का या बद्दल प्रश्न सर्वेक्षणात विचारण्यात आले. ह्या गृहीतकाची दोन भागात विभागणी करण्यात आली.

i)सर्व शिक्षा अभियान अनुदानातील पैसे वेळेत उपलब्द होत नाही.

ह्या गृहीतकाची तपासणी करण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२अ)i), प्रश्न क्र२अ)iii) व प्रश्न क्र. २अ)v) सर्वेक्षणात विचारण्यात आले.

X2 चाचणीचे परीक्षण केले असता चाचणीचे गणितीय मूल्य ०.०५ सार्थक ते वरील सारणी मुल्यापेक्षा (∝ = ०.०५) जास्त आहे. d.f.=n - 1 = 6 - 1 = 5 X2 चाचणीचे गणितीय मुल्य ५% लक्षणीय पातळीला २६१.३९ हे तक्ता मुल्य ११.०७ पेक्षा जास्त आहे याचा अर्थ परिकल्पना चुकीची आहे. म्हणजेच शून्य परिकल्पनेचा स्वीकार केला जातो. व त्यावरून असे सिध्द होते की, सर्व शिक्षा अभियान योजनेतील अनुदानातून पैसे वेळेत उपलब्द होतात.

ii)सर्व शिक्षा अभियान अनुदानातील पैसे पुरेशा प्रमाणात उपलब्द होत नाही.

ह्या गृहीतकाची तपासणी करण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २अ)ii), प्रश्न क्र. २अ)iv) व प्रश्न क्र. २अ)vi) सर्वेक्षणात विचारण्यात आले. X2 चाचणीचे परीक्षण केले असता चाचणीचे गणितीय मूल्य ०.०५ सार्थक ते वरील सारणी मुल्यापेक्षा (∝ = ०.०५) जास्त आहे. d.f.= n - 1 = 6 - 1 = 5 X 2

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

चाचणीचे गणितीय मुल्य ५% लक्षणीय पातळीला १७५.७१ हे तक्ता मुल्य ११.०७ पेक्षा जास्त आहे याचा अर्थ परिकल्पना चुकीची आहे. म्हणजेच शून्य परिकल्पनेचा स्वीकार केला जातो. व त्यावरून असे सिध्द होते की, सर्व शिक्षा अभियान योजनेतील अनुदानातून पैसे पुरेशा प्रमाणात उपलब्द होतात.

**गृहीत कृत्य क्र. ३ ची पडताळणी केली असता** ह्या गृहीत कृत्याच्या पडताळणीसाठी Z चाचणीचा वापर करण्यात आला विश्लेषणासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३ ii) नुसार बँक खात्याचे व्यवहार कशा प्रकारे करतात. या माहीतीसाठी प्रश्न विचारण्यात आला. त्यानुसार रोख रक्कम खात्यातून काढून व्यवहार करणाऱ्या शाळा ४७ व बेरर चेकचा वापर करून व्यवहार करणाऱ्या शाळा १९५ तर क्रॉस चेकचा वापर करून व्यवहार करणाऱ्या शाळा ४४३ आहेत अशी उत्तरे मिळाली.म्हणजेच यावरून असा अर्थ काढण्यात आला कि रोख रक्कम खात्यातून काढून व बेरर चेकने व्यवहार करणे म्हणजे रोखीने व्यवहार करणाऱ्या शाळा (४७+१९५) = २४२ आहेत तर बँक व्यवहार करण्यासाठी वापरली जाणारी योग्य पध्दत म्हणजे क्रॉस चेकने व्यवहार ४४३ शाळांमार्फत केले जातात.

Z चाचणीचे परीक्षण केले असता चाचणीचे गणितीय मूल्य ०.०५ सार्थक ते वरील सारणी मुल्यापेक्षा ($\propto$ = ०.०५) जास्त आहे. d.f.=n - 1 = २ - १ = १ Z चाचणीचे गणितीय मुल्य ५% लक्षणीय पातळीला ७.६८० हे तक्ता मुल्य १.९६ पेक्षा जास्त आहे याचा अर्थ परिकल्पना बरोबर आहे. म्हणजेच शून्य परिकल्पनेचा अस्वीकार केला जातो. व त्यावरून असे सिध्द होते की, सर्व शिक्षा अभियान अनुदान खर्चा बाबत सर्व व्यवहार बँक साधनां मार्फत होतात.

**गृहीत कृत्य क्र. ४ ची पडताळणी केली असता** ह्या गृहीत कृत्याच्या पडताळणीसाठी X2 (काय स्कुअेर) चाचणीचा वापर करण्यात आला. विश्लेषणासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र.४ब)i), ४ब)ii), ४क)iii) व ४क)iv) नुसार सर्व शिक्षा अभियान अनुदान खर्च करताना टेंडर व कोटेशन पध्दतीचा वापर होते का या बद्दल प्रश्न सर्वेक्षणात विचारण्यात आले त्यानुसार ह्या गृहीतकाची दोन भागात विभागणी करण्यात आली.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

i) सर्व शिक्षा अभियान अनुदान खर्च करताना टेंडर या पध्दतीचा वापर होत नाही.

ह्या गृहीतकाची तपासणी करण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४क)i) व ४क)ii) सर्वेक्षणात विचारण्यात आले.

X2 चाचणीचे परीक्षण केले असता चाचणीचे गणितीय मूल्य ०.०५ सार्थक ते वरील सारणी मुल्यापेक्षा ($\propto$ = ०.०५) जास्त आहे. d.f.=n - 1 = २ - १ = १ X2 चाचणीचे गणितीय मुल्य ५% लक्षणीय पातळीला ०.३३ हे तक्ता मुल्य ३.८४ पेक्षा कमी आहे याचा अर्थ परिकल्पना बरोबर आहे. म्हणजेच शून्य परिकल्पनेचा अस्वीकार केला जातो. व त्यावरून असे सिध्द होते की, सर्व शिक्षा अभियान अनुदान खर्च करताना टेंडर या पध्दतीचा वापर होत नाही.

ii) सर्व शिक्षा अभियान अनुदान खर्च करताना कोटेशन या पध्दतीचा वापर होत नाही.

ह्या गृहीतकाची तपासणी करण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४ब)i) व ४ब)ii) सर्वेक्षणात विचारण्यात आले.

X2 चाचणीचे परीक्षण केले असता चाचणीचे गणितीय मूल्य ०.०५ सार्थक ते वरील सारणी मुल्यापेक्षा ($\propto$ = ०.०५) जास्त आहे. d.f.=n - 1 = २ - १ = १ X2 चाचणीचे गणितीय मुल्य ५% लक्षणीय पातळीला ४.१७२ हे तक्ता मुल्य ३.८४ पेक्षा जास्त आहे याचा अर्थ परिकल्पना चुकीची आहे. म्हणजेच शून्य परिकल्पनेचा स्वीकार केला जातो. व त्यावरून असे सिध्द होते की, सर्व शिक्षा अभियान अनुदान खर्च करताना कोटेशन या पध्दतीचा वापर करतात.

**गृहीत कृत्य क्र. ५ ची पडताळणी केली असता** महाराष्ट राज्य प्राथमिक शिक्षण परीषदेने कार्यान्वित केलेली मार्गदर्शक तत्वे अनुदान खर्च करताना आमलात आणली जातात का? या बद्दल सर्वेक्षणात प्रश्न विचारण्यात आला.

Z चाचणीचे परीक्षण केले असता चाचणीचे गणितीय मूल्य ०.०५ सार्थक ते वरील सारणी मुल्यापेक्षा ($\propto$ = ०.०५) जास्त आहे. d.f.=n - 1 = २ - १ = १ Z चाचणीचे गणितीय मुल्य ५% लक्षणीय पातळीला २३.८८ हे तक्ता मुल्य

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

१.९६ पेक्षा जास्त आहे याचा अर्थ परिकल्पना चुकीची आहे. म्हणजेच शून्य परिकल्पनेचा स्वीकार केला जातो. व त्यावरून असे सिध्द होते की, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परीषदेने कार्यान्वित केलेली मार्गदर्शक तत्वे अनुदान खर्च करताना आमलात आणली जातात.

**सर्वेक्षणाचे निष्कर्ष:-**

**१)** ६-१४ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना शिक्षणाच्या सुविधा उपलब्द करून देण्याच्या उद्देशाने सर्व शिक्षा अभियान योजना राबवली जाते.

२) सर्व शिक्षा अभियान योजना अनुदानातून पैसे वेळेत व पुरेशा प्रमाणात उपलब्द होतात.

३)सर्व शिक्षा अभियान अनुदान खर्चा बाबत सर्व व्यवहार बँक साधनां मार्फत होतात.

४)सर्व शिक्षा अभियान अनुदान खर्च करताना टेंडर पध्दतीचा वापर होत नाही परंतू कोटेशन पध्दतीचा वापर होतो.

५) महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परीषदेने कार्यान्वित केलेली मार्गदर्शक तत्वे अनुदान खर्च करताना आमलात आणली जातात.

**उपाययोजना:-**

१) इ. १ ते इ. ४ थी पर्यंत सर्व शिक्षा अभियान अनुदान अंतर्गत शाळांमधून मोठ्या संख्यने दिले जाते. त्याच शाळांमधून इ. १ ली. ते इ. ८ वी पर्यंतचे शिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्द करून दिले जावे. जेणे करून सर्व शिक्षा अभियान योजना सुरु करण्या मागील तत्वाचे संपूर्ण पालन म्हणजेच ०६ वर्षे ते १४ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना शिक्षणाच्या सोयी सुविधा उपलब्द करून देणे शक्य होईल.

२) शाळांमध्ये ज्या सोयी-सुविधा उपलब्द नाहीत किंवा अभाव आहे त्यांचा शोध घेवून विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत अनुदान उपलब्द करून द्यावे.

३) प्रतिवर्षी शाळांना दिली जाणारी अनुदाने शाळा अनुदान, शिक्षक अनुदान व शाळा देखभाल व दुरुस्ती अनुदान वेळेत व त्यातून पुरेशा प्रमाणात आवश्यक

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

त्या सर्व गोष्टींची खरेदी करता येईल यादृष्टीने शिक्षकांची मते विचारात घेवून अनुदान द्यावे.

५) शाळा बांधकाम अंतर्गत शाळा इमारत बांधकाम, नवीन खोल्यांचे बांधकाम व शाळेची मोठ्या प्रमाणावरील दुरुस्ती इ. कामांचे दुर्गम भागांचा विचार करून पुरेशा प्रमाणात अनुदान द्यावे. तसेच जिल्हा स्तरावरून वरील प्रकारची कामे करण्याच्या दृष्टीने टेंडर काढली जावी. ही सर्व कामे करून देण्याची सर्व जबाबदारी जिल्हा / शहरी मुख्य कार्यालयांची व गटसाधन केंद्र / शहरी साधन केंद्र यांची असावी.

६) शाळा ग्राम शिक्षण समिती / शाळा व्यवस्थापन समितीची कार्ये, अधिकार व जबाबदाऱ्या काय आहे यांची माहिती देण्यात यावी.

८) सर्व शिक्षा अभियान अनुदान खर्चाचे सर्व प्रकारचे व्यवहार क्रॉस चेकच्या सहाय्याने केले जावे. म्हणजेच अनुदान खर्च करताना रोख रक्कमेने व बेरर चेकने केलेले व्यवहार केले जाणार नाही याची काळजी घ्यावी.

९) सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत शाळांच्या खात्यावर अनुदान जमा करताना शाळांच्या शिक्षकांना मेसेज / इमेल केला जावा. तसेच अनुदान कशा प्रकारे खर्च केले जावे कोणत्या अनुदानातून कोणत्या वस्तूंची / साधनांची खरेदी केली जावी याबाबतची माहिती दिली जावी.

१०) सर्व शिक्षा अभियान अनुदान मार्गदर्शन विषयक कार्यशाळा / प्रशिक्षण शिक्षकांना देण्यात यावे.

११) महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदे मार्फत सर्व शिक्षा अभियान अनुदान विषयक मार्गदर्शन पुस्तीका प्रत्येक अनुदान प्राप्त शाळेला दिली जावी. तसेच वेळोवेळी जे बदल प्रतिवर्षी अनुदान विषयक केले जातात त्यांची माहिती द्यावी.

१२) मोठ्या रकमेच्या वस्तूची खरेदी करण्यापूर्वी कोटेशन घेवूनच खरेदी केली जावी याबाबतच्या सुचना शाळांना दिल्या जाव्यात.

**संदर्भ:-**

डॉ. पाटील वा. भा. संशोधन पध्दती (२०१०) प्रशांत पब्लिकेशन जळगाव

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

डॉ. कायंदे- पाटील गंगाधर वि., संशोधन पध्दती (२००९) चैतन्य पब्लिकेशन्स नाशिक

डॉ. पाटील वा. भा., संशोधन पध्दती (२०१०), प्रशांत पब्लिकेशन जळगाव

*Kothari C.R. Reasearch Methodology, Methods and Techniques (2004) New Age International (P) Ltd.,Publishers, New Delhi, Page no.111*

प्रा. देशमुख राम, मुलभूत सांख्यिकी (२००५), विद्या प्रकाशन, नागपूर

*Katdare K.D., Quantitative techniques (2013), Prashant Publication Jalgaon*

डॉ. प्रभाकर देशमुख, मुलभूत सांख्यिकी, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

प्रा. देशमुख राम, मुलभूत सांख्यिकी (२००५), विद्या प्रकाशन, नागपूर

डॉ. पाटील वा. भा., संशोधन पध्दती (२०१०), प्रशांत पब्लिकेशन जळगाव

डॉ. आगलावे प्रदीप, सामाजिक पध्दती शास्त्र व तंत्रे (२०००), विद्या प्रकाशन, नागपूर

*Gazette* धुळे, जळगाव व नंदुरबार

भारतीय राज्य घटना - डॉ. बी. आर. आंबेडकर

सर्व शिक्षा अभियान योजना अनुदान पुस्तिका

ग्राम शिक्षण समिती – माहिती पुस्तिका

संशोधनाची प्रश्नावली / अनुसूची

*www.mhrd.gov.in*

*www.ncert.nic.in*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*